निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : १९८ वा.
रविवार - २१ सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## संक्षिप्त

## मंत्रालयात २३ ते २६ सप्टेंबर कालावधीत नवतेजस्विनी प्रदर्शनाचे आयोजन

**मुंबई**/ ग्रामीण भागातील महिला स्वयंसहाय्यता गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना शहरी ग्राहकवर्गाशी थेट जोडणे, विक्रीला चालना देणे आणि महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला बळकटी देणे यासाठी त्यांच्या उत्पादनांच्या नवतेजस्विनी प्रदर्शनाचे आयोजन मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात करण्यात येणार आहे.

बालविकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) मार्फत आयोजित करण्यात आले आहे.

या प्रदर्शनाला महिला व बालविकास विभागाच्या मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डिकर आणि सचिव डॉ. अनुप कुमार यादव हे भेट देऊन ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देतील.




हे प्रदर्शन दि. २३ ते २६ सप्टेंबर या कालावधीत दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५.३० या वेळेत असणार आहे, अशी माहिती माविमच्या व्यवस्थापकीय संचालिका राजलक्ष्मी शाह यांनी दिली आहे.

हे प्रदर्शन महिला व

या प्रदर्शनात एकूण १२ स्टॉल्स उभारले जाणार असून, त्यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आकर्षक बांबूच्या वस्तू, गोंदियाच्या लाखेच्या बांगड्या, वारली कलेच्या वस्तू, चित्रे, पौष्टिक व चविष्ट मिलेटयुक्त पदार्थ यांसारखी उत्पादने असणार आहेत.

# कायदा व सुव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीने देशाची महासत्तेकडे वाटचाल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई** / कायदा व सुव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीने देश महासत्तेकडे वाटचाल करू शकतो. कायदा व सुव्यवस्थेचे पालन करताना अमली पदार्थ संदर्भातील गुन्ह्ये हे पोलीस दलासमोर आव्हान ठरत असून यासाठी झीरो टॉलरन्स धोरण राज्याने अवलंबले आहे. तसेच बदलत्या काळानुसार सायबर क्षेत्रातील गुन्ह्याची उकल करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

इंडियन पोलीस फाऊंडेशनच्या १० व्या स्थापना दिनानिमित्त भारताच्या आर्थिक विकासासाठी पोलीस दल-ाची पुनर्कल्पना या विषयावर चर्चा सत्राचे पोलीस मुख्यालय, कुलाबा येथे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. कार्यक्रमास उत्तर प्रदेशचे सामाजिक न्याय राज्यमंत्री असीम अरूण, इंडियन पोलीस फाऊंडेशनचे प्रमुख तथा मेघालयचे माजी राज्यपाल आर.एस. मुशहारी, फाउंडेशनचे अध्यक्ष उत्तर प्रदेशचे माजी पोलीस महासंचालक ओ. पी.सिंह, राज्याचे पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्यासह विविध राज्यातील पोलीस अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र पोलीस आणि मुंबई पोलिसांनी कायम उच्च दर्जा टिकवून ठेवल्याचा अभिमान आहे. पोलीस आज भारताच्या आर्थिक विकासावर चर्चा करीत आहेत ही अभिनंदनीय बाब असून, पोलीस दलात आणखी चांगले बदल घडविण्यासाठी आजच्या कार्यक्रमात होणारे विचार मंथन महत्वपूर्ण ठरतील. या विचारमंथनातून येणारे नवीन उपाययोजनांचा शासन सकारात्मक विचार करेल असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले,पोलीस दल तसेच समाजातही एकात्मता असणे आवश्यक आहे. यामुळे समाजातील नकारात्मकता कमी होते आणि राज्य व देश शाश्वत प्रगतीकडे वाटचाल करू शकतो. काळानुरूप गुन्ह्यांचे स्वरूप बदलले असून, जुन्या काळातील शाश्वत मुल्यांसह नव तंत्रज्ञानाचा वापर केल्यास प्रगती शक्य आहे. त्यानुसार २०२३ मध्ये नवीन पोलीस संघटनात्मक रचना तयार केली आहे.



गुन्ह्यांची जलद उकल करण्यास मदत व्हावी यासाठी अत्याधुनिक सायबर सिक्युरिटी लॅब उभारण्यात आली आहे. इतर देशांनीही आपल्या राज्यासारखी लॅब बनविण्याची मागणी केली आहे. एआयच्या सहायाने गुंतागुंतीचे गुन्हे प्रकरणे अधिक वेगाने सोडविण्यात मदत होत आहे. देश आणि राज्याची तिन्ही दल सक्षम असल्याने अमली पदार्थांच्या माध्यमातून गुन्हेगारी वाढविणे आणि तरूणांना निष्क्रीय करण्यात येत आहे. आज अमली पदार्थांची गुन्हेगारी पोलीस दलासमोर एक आव्हान आहे. यामध्ये झीरो टोलरन्स असणे महत्वाचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

संविधानात पोलीस व्यवस्थेत चेक अँड बॅलन्सची तरतूद असून अनेक अधिकाऱ्यांनी उपलब्ध कायद्यांचा वापर करून परिवर्तनशील सुधारणा केल्याचे त्यांनी अधोरेखित केले. आयपीसी, सीआरपीसी व इंडियन एव्हिडन्स ॲक्ट हे इंग्रजांच्या काळातील कायदे असल्याने लोकशाहीच्या अधिष्ठानावर त्यात आवश्यक बदल करण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. पोलीसांची भूमिका अधिक प्रभावी होण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आणि डिजीटल व्यासपीठांचा वापर करणे आवश्यक आहे. सोशल मीडिया आणि ऑनलाईन प्लॅटफॉमद्वारे गुन्हेगारी वाढत असून, डेटा नालिटिक्स, मशीन लर्निंग आणि डिजिटल ट्रॅकिंग, ऑनलाईन गुन्ह्यांवर जलद प्रतिसादासाठी विशेष असे नव तंत्रज्ञान आणि पद्धती वापरणे आवश्यक आहे.

आपली अर्थव्यवस्था कृषी आधारित होती. आताही कृषी क्षेत्र तेवढेच महत्वाचे असून, बदलत्या काळानुरूप अर्थव्यवस्था सेवा क्षेत्रावर अवलंबून आहे. राज्य किंवा देशाची अर्थव्यवस्था ५५ ते ६५ टक्के सेवा क्षेत्रावर अवलंबून आहे. या दोन्ही क्षेत्रावर आधारलेल्या अर्थव्यवस्थेची आव्हाने वेगळी आहेत. त्यामुळे बदलत्या सेवा क्षेत्राची परिभाषा समजून घेणे आवश्यक आहे. पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासोबतच शाश्वत मूल्ये कायम ठेवण्याचा प्रयत्न होणेही आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी गुंतवणूक परिसंस्थेत विश्वात आणि स्थिरता निर्माण करण्यासाठी पोलीस प्रशासन, डिजीटल सीमांचे संरक्षण : धोरणात्मक पोलिस - उद्योग सहकार्याची गरज या विषयांवर चर्चा करण्यात आली.

# नांदेड, परभणी, सातारा, सांगली जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ६८९ कोटी ५२ लाख ६१ हजार रुपयांच्या निधीस मान्यता - मंत्री मकरंद जाधव-पाटील

**मुंबई** / अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा व मदत देण्यासाठी शासन संवेदनशील असून जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत नांदेड, परभणी, सातारा आणि सांगली जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसानीपोटी मदत देण्यासाठी ६८९ कोटी ५२ लाख ६१ हजार रुपयांच्या निधीस शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

**नांदेड जिल्हा**

ऑगस्ट २०२५ मध्ये अतिवृष्टी व पुरामुळे ७ लाख ७४ हजार ३१३ शेतकऱ्यांचे ६ लाख ४८ हजार ५३३.२१ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली. यासाठी ५५३ कोटी ४८ लाख ६२ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

**शासन निर्णय**

**परभणी जिल्हा**

जून ते ऑगस्ट २०२५ दरम्यान अतिवृष्टी व पुरामुळे २ लाख ३८ हजार ५३० शेतकऱ्यांचे १ लाख ५१ हजार २२२.६ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, त्यांना १२८ कोटी ५५ लाख ३८ हजार रुपयांची मदत मिळणार आहे.

**सातारा जिल्हा**

जून ते ऑगस्ट २०२५ दरम्यान झालेल्या पावसामुळे १४२ शेतकऱ्यांचे २१.६० हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली. त्यासाठी शासनाने ३ लाख २३ हजार रुपयांची मदत मंजूर केली आहे.

**सांगली जिल्हा**

जून ते ऑगस्ट २०२५ दरम्यान झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे १३ हजार ४७५ शेतकऱ्यांचे ४ हजार ७४.२७ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. यासाठी ७ कोटी ४५ लाख ३८ हजार रुपयांच्या मदतीस मान्यता देण्यात आली आहे.

**शासन निर्णय**

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना मदत करण्यात शासन संवेदनशील असून अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी बाधित शेतपिकांचे तात्काळ पंचनामे करण्यात



आले. बाधित पिकांच्या पंचनामा अहवाल शासनास प्राप्त होताच शासनाने या मदतीच्या निधीस तत्काळ मंजुरी दिली असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

तसेच, नैसर्गिक आपत्तीमध्ये दिलेल्या मदतीचा निधी शेतकऱ्यांच्या कर्ज अथवा अन्य वसुलीत वळती करू नयेत यासाठी संबधित जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावरून बँकांना निर्देश द्यावेत, अशा स्पष्ट सूचनाही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी दिल्या आहेत.

# TCS, Infosy, Microsoft, -mazon सह अनेक बड्या कंपन्यांमधील भारतीय IT कर्मचाऱ्यांना अमेरिकेचा आणखी एक मोठा सर्वात जबदस्त झटका! हातात फक्त २४ तास...

अमेरिकेतील भारतीय नोकदरांना ट्रम्प प्रशासन दणका देण्याच्या तयारीत आहे. H-1B व्हिसाबाबत अमेरिकेत नवं धोरण लागू झालंय. यामुळे TCS, Infosy, Microsoft सह अनेक बड्या कंपन्यांमधील भारतीय IT कर्मचाऱ्यांना अमेरिकेचा आणखी एक मोठा सर्वात जबदस्त झटका दिला आहे. क१इ व्हिसावरील नवीन शुल्क नियम लागू होण्यापूर्वीच, अमेरिकन आयटी दिग्गजांनी त्यांच्या परदेशी कर्मचाऱ्यांना, विशेषतः भारतीय कर्मचाऱ्यांना ईमेलद्वारे एक आदेश पाठवला आहे, ज्यामध्ये त्यांना कोणत्याही परिस्थितीत एका दिवसाच्या आत अमेरिकेत परतण्यास सांगितले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मायक्रोसॉफ्टने भारतात प्रवास करणाऱ्या त्यांच्या क-१इ कर्मचाऱ्यांना एक तातडीची अंतर्गत सूचना जारी केली आहे, ज्यामध्ये त्यांना २ सप्टेंबरनंतर अमेरिकेत प्रवेश करण्यास मनाई केली जाऊ शकते असा इशारा देण्यात आला आहे.

मायक्रोसॉफ्टने अमेरिकेत असलेल्या H-1B व्हिसा धारकांना त्यांच्या प्रवास




योजना रद्द करण्याचा आणि नजीकच्या भविष्यासाठी अमेरिकेत राहण्याचा सल्ला दिला आहे. या घोषणेत क-४ व्हिसा धारकांच्या अवलंबितांचा थेट उल्लेख नसला तरी, कंपनीने त्यांच्या पती-पत्नी आणि मुलांना आंतरराष्ट्रीय प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा त्यांच्या निर्णयाने जगाला धक्का दिला आहे. शुक्रवारी त्यांनी एका घोषणेवर स्वाक्षरी केली ज्यामुळे H-1B व्हिसाचे शुल्क दरवर्षी १००,००० अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढणार आहे. याचा थेट परिणाम कामासाठी किंवा नोकरीसाठी अमेरिकेत प्रवास करणाऱ्यांवर होणार आहे. -mazon, Tata Consultancy Services आणि Microsoft सारख्या दिग्गज IT कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना याचा सर्वाधिक फटका बसणार आहे. व्हिसासाठीच्या नवीन शुल्क नियमांमुळे भारतीय खढ कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. ७० टक्क्यांहून अधिक H-1B व्हिसाधारक भारतीय नागरिक आहेत, त्यामुळे या घोषणेचा भारताच्या आयटी क्षेत्रावर मोठा परिणाम होण्याची अपेक्षा आहे.

# जमिनीच्या आत १० मजली इमारती इतकं खोल रेल्वे स्टेशन; महाराष्ट्रात भारतातील सर्वात मोठे अंडर ग्राऊंड रेल्वे स्टेशन

**मुंबई** / महाराष्ट्रात बुलेट ट्रेनचे काम प्रगतीपथावर आहे. भारतातील सर्वात मोठे अंडर ग्राऊंड रेल्वे स्टेशन आपल्या महाराष्ट्रात निर्माण होत आहे. मुंबईतील वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये बुलेट ट्रेनचे एकमेव भूमिगत स्टेशन बांधले जात आहे. या रेल्वे स्टेशनची खोली १० मजली इमारती इतकी इतकी आहे. छक्डठउ्ड मार्फत हे स्टेशन बांधले जात आहे.

या रेल्वे स्टेशनमध्ये तीन मजले असणार आहेत. इ१, इ२ आणि इ३. सध्या, लोक किती काम पूर्ण झाले आहे. या स्टेशनसाठी ८३ टक्के खोदकाम पूर्ण झाले आहे. अंदाजे ३२ मीटर म्हणजे १० मजली इमारती इतके उंच स्टेशन जमिनीखाली बांधले जात आहे. हे स्टेशन १.०८ किलोमीटर लांब आणि ६६ मीटर रुंद असेल.

सर्वात खालच्या मजल्यावर असलेल्या इ३ वर काम आधीच सुरू झाले आहे. हे स्टेशन २०२७ पर्यंत पूर्ण होईल. हे स्टेशन मेट्रो मंडेला डीव्ही रोडच्या अगदी शेजारी बांधले जात आहे. बुलेट ट्रेन स्टेशन मेट्रोच्या आयएलईएस स्टेशनशी जोडले जाईल, ज्यामुळे प्रवाशांना उतरून मेट्रोमध्ये चढता येईल. स्टेशनवर एकूण सहा प्लॅटफॉर्म बांधले जात आहेत.

या तीन मजली स्टेशनवर फक्त प्लॅटफॉर्म इ३ असेल. प्रवेश फक्त तिकिटे असलेल्यांसाठी खुला असेल, म्हणजेच फक्त प्रवाशांनाच परवानगी असेल. इ२ मध्ये तिकीट खिडकी आणि कॅफेटेरिया असेल. या मजल्याचा वापर व्यावसायिक कारणांसाठी देखील केला जाईल. दरम्यान, इ१ मध्ये सुरक्षा आणि इतर महत्त्वाची कार्यालये असतील.

आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांना बाहेर पडण्यासाठी जास्त वेळ वाट पाहू नये यासाठी हे स्थानक डिझाइन केले जात आहे. जास्तीत जास्त सहा मिनिटांत बाहेर पडण्याचे मार्ग असतील, ज्यामुळे ते सुरक्षितपणे बाहेर पडू शकतील.

या मार्गावर २१ किलोमीटरचा बोगदा बांधला जाणार आहे. शिवाय, संपूर्ण ट्रॅक उंचावलेला असेल. २१ किलोमीटरच्या बोगद्यातील ४.८८ किलोमीटरचे खोदकाम पूर्ण झाले आहे. बोगदा वेळेवर पूर्ण होईल. तो २०२८-२९ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. त्याची सुरुवात १० कोचच्या ट्रेनने होईल. बुलेट ट्रेनमध्ये सुरुवातीला १० कोच असतील. त्यानंतर प्रवाशांच्या संख्येनुसार ते १६ कोचपर्यंत वाढवले जाईल.



# द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी ; राजू श्रीवास्तव

**प्रसिद्ध स्टॅण्ड अप कॉमेडियन राजू श्रीवास्तव यांचा आज २१ सप्टेंबर रोजी तिसरा स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली होती. त्यांच्या अकाली निधनाने मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली होती. द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी अशी ओळख असलेल्या राजू श्रीवास्तव यांचा २५ डिसेंबर १९५३ रोजी उत्तरप्रदेश मधील कानपुर येथे जन्म झाला. राजू श्रीवास्तव यांचे वडील कवी होते. बलई काका नावाने त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. राजू श्रीवास्तव लहान असताना आपल्या वडिलांच्या कविता म्हणत. शालेय वयातच त्यांना नकला करण्याचा छंद लागला. शाळेतील शिक्षकांच्या व गावातील माणसांच्या ते हुबेहूब नकला करत. पुढे ते अमिताभ बच्चन यांची नक्कल करू लागले. अमिताभ बच्चन यांचा हुबेहूब आवाज काढून त्यांनी केलेली नक्कल लोकांना इतकी आवडली की लोक त्यांना ज्युनिअर अमिताभ म्हणू लागले. अमिताभ बच्चन यांच्याप्रमाणेच त्यांनी चित्रपट सृष्टीतील इतर कलाकारांची देखील नक्कल करण्यास सुरुवात केली. त्यांचा हा नकलाचा कार्यक्रम प्रेक्षकांना आवडू लागला. कानपूरमधील प्रेक्षक त्यांना कॉमेडीसाठी बोलवू लागले. त्यांचे कार्यक्रम लोकप्रिय होऊ लागले तेंव्हा त्यांच्या एका मित्राने त्यांना त्यांच्या कॉमेडीची सीडी बनवून विकण्याचा सल्ला दिला. मित्राने दिलेला हा सल्ला त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. राजू श्रीवास्तव यांनी त्यांच्या कॉमेडीची सीडी मार्केटमध्ये आणल्यानंतर त्यांच्या सिडीला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला. मुंबईतही त्यांच्या सीडी विकल्या जाऊ लागल्या. मुंबईतही त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली त्यामुळे ते मुंबईत आले आणि चित्रपटांसाठी ऑडिशन देऊ लागले. तेजाब आणि मैने प्यार किया या चित्रपटात त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. त्यांनतर बाजीगर, मिस्टर आझाद या चित्रपटातही त्यांनी भुमीका केल्या मात्र या भूमिकांनी त्यांना समाधान दिले नाही त्यामुळे ते टीव्हीकडे वळले. देख भाई देख या विनोदी मालिकेत त्यांना काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी शक्तिमान या मालिकेत काम केले. चित्रपट आणि टीव्हीवर काम करताना त्यांनी त्यांची स्टॅण्ड अप कॉमेडी काही सोडली नव्हती ते स्टॅण्ड अप कॉमेडी करतच होते. २००५ साली टीव्हीवर द ग्रेट इंडियन लाफटर चॅलेंज नावाचा कॉमेडी शो आला होता. या शो मध्ये त्यांनी भाग घेतला. या शो ने त्यांना स्टार बनवले. या शो मध्ये त्यांनी सादर केलेले गजोधर काका, पिंकी पार्लरवाली ही पात्रे खूप लोकप्रिय झाली. या शो नंतर त्यांचे देशभर नाव झाले. त्यांना अनेक कार्यक्रमांमध्ये बोलावले जायचे. या काळात त्यांची कॉमेडी किंग अशीच इमेज झाली होती. २००९ साली त्यांनी बिग बॉस शो मध्येही भाग घेतला होता. २००५ ते २०१० हा त्यांचा सुवर्णकाळ होता. या काळात त्यांची लोकप्रियता गगनाला भिडली होती. त्याचा लाभ घेऊन राजकारणात उतरण्याचा त्यांनी निर्णय घेतला मात्र त्यांना राजकारण मानवले नाही त्यामुळे ते पुन्हा कॉमेडीकडे वळले. त्यांनी आपली स्टॅण्ड अप कॉमेडी पुन्हा सुरू केली. आपल्या स्टॅण्ड अप कॉमेडीने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. राजू श्रीवास्तव यांच्याप्रमाणे अनेकांनी स्टॅण्ड अप कॉमेडी करण्याचा प्रयत्न केला पण राजू श्रीवास्तव यांच्या सारखी नक्कल आणि स्टँड अप कॉमेडी कोणालाही जमू शकली नाही. २१ सप्टेंबर २०२२ रोजी त्यांचे अकाली निधन झाले. चित्रपट, टीव्ही आणि स्टेज शो मधून प्रेक्षकांना खळखळून हसवणारे राजू श्रीवास्तव यांचे असे अकाली जाणे प्रेक्षकांना चटका लावून जाणारे ठरले. स्टॅण्ड अप कॉमेडीचे किंग राजू श्रीवास्तव यांना तिसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!**

# भारत विश्व शांतीचे उगमस्थान व आधारस्तंभ

जगात शांतता प्रस्थापित रहावी या उद्देशाने १९८१ पासुन संयुक्त राष्ट्र महासभेने २१ सप्टेंबर विश्व शांती दिवस साजरा करण्याची घोषणा केली.तेव्हा पासून जगात विश्व शांती दिवस साजरा करण्यात येतो.जगात भारताला शांतीचे प्रतीक मानल्या जाते.विश्र्वशांतीची सुरूवात भारतानेच केली आणि पुढेही विश्र्व शांतीची जोत भारताकडून अशीच प्रज्वलित होत राहील हे आपल्याला जी-२० शिखर परिषदेवरून लक्षात येते.आज जगात शांती कशी प्रस्थापीत करता येईल याकडे भारताचे संपूर्ण लक्ष आहे. भारत हा देवी-देवता, ऋषि-मुनी, साधु-संत,ज्ञानी, थोर महात्म्ये, क्रांतिकारक,जहालवादी-मवाळवादी अशा अनेक विचारवंतांच्या प्रयत्नाने बनलेला जगाच्या पाठीवरील एकमेव देश भारत आहे.त्यामुळे जगात शांतता कशी प्रस्थापीत करता येईल याचा अभ्यास करण्याकरिता संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे नेहमीच असते. कारण जगाच्या पाठीवर भारताचा उगम शांतता प्रस्थापित करण्यासाठीच झाला असावा. त्यामुळे गंगा,कावेरी, गोदावरी, नर्मदा, यमुना, वैनगंगा,तापी, कृष्णा इत्यादी नद्या सुध्दा शांतीचे द्योतक मानले जाते.भारताने नेहमी शांततेचा पुरस्कार केला आहे आणि करीत राहिल.गौतम बुध्दासारख्या महाज्ञानी यांनी भारतात शांतीची जोत प्रज्वलीत केली व संपूर्ण जगभर फीरवीली.मर्यादा पुरूषोत्तम राम यांनी सुध्दा शांततेचा पाठ संपूर्ण जगाला शिकवणीला व इस्लामिक धर्मगुरू महम्मद पैगंबर यांनी सुध्दा विश्र्व शांती करीता मोठे अभियान छेडले होते त्याचप्रमाणे शिख गुरू गुरूनानक देवजी यांनीही शांती प्रस्थापित करण्यासाठी मोलाची कामगिरी केली.पुर्वी आणि आताही विश्वात शांती प्रस्थापित करण्यासाठी भारत अग्रेसर होता आणि आहे.यात तिळमात्र शंका नाही.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले असुन जगातील अनेक देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.यामुळे जगात तिसऱ्या महायुद्धाची आहाटनिर्माण केली आहे. जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी भारत संपूर्ण ताकद लावीत आहे तर चीन नेहमीच शांती भंग करण्याच्या तयारीत असतो.परंतु भारताचे काम शांततेने होत नसेल तर भारतही उग्ररूप धारण करून चीनला पटकनी देवु शकते.मानवाचा जन्म शांतता प्रस्थापित करण्यासाठी व जिवसृष्टीचे संरक्षण करण्यासाठी झाला आहे.परंतु चीन कुत्रे, मांजर, चामगाधड, पाल,साप,जे भेटेल ते खातात त्यामुळे आज चीनची बुध्दी कुत्र्यासारखी झाली आहे.त्यामुळे चीनने जर शांती भंग केली तर कुत्ते की मौत मारा जायेगा ही बाब चीनने लक्षात ठेवली पाहिजे.कारण वेळ पडल्यास तैवान चीनला सूध्दा भारी पडु शकतो. जगात आतंकवाद दिवसेंदिवस वाढत होता यामुळे जगातील संपूर्ण देशात भीतीचे वातावरण निर्माण होवून शांती भंग होत होती.शेवटी संपूर्ण जगाला शपथ घ्यावी लागली की जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी आतंकवाद्यांचा खात्मा होणे गरजेचे आहे.त्या पध्दतीने प्रत्येक देशांनी आतंकवाद्यांविरूध्द कारवाईला सुरुवात केली.कारण प्रत्येक देश आतंकवाद्यांच्या कारवाईने त्रस्त होते आणि आहे.परंतु संपूर्ण विश्र्वाला वाटायला लागले की आतंकवाद्यांचा नायनाट केल्याशिवाय जगात शांतता प्रस्थापित होवुच शकत नाही.त्या अनुषंगाने आज प्रत्येक देश शांततेसाठी आतंकवाद्यांचा खात्मा करण्यास दृढ संकल्प असल्याचे दिसून येते. सध्याच्या परीस्थितीत चिनच्या विस्तारवादी नितीमुळे विश्र्व शांती भंग होण्याच्या मार्गावर आहे.चीन-तैवान संघर्ष लक्षात घेता चायना सी मध्ये चीनला टक्कर देण्यासाठी अमेरिकेसह नाटो सेना सज्ज झाली आहे त्याचबरोबर जापान व ऑस्ट्रेलियाने सूध्दा कंबर कसली आहे. म्हणजेच सध्याच्या परिस्थितीत जगातील शांती भंग करण्याचे काम चीन करीत आहे.याचे प्रायचीत्य संपूर्ण जगाला भोगावे लागु शकते.जगात शांती प्रस्थापित व्हायची असेल तर चीनला त्याची जागा दाखववीच लागेल.चीनच्या विस्तारवादी धोरणामुळे संपूर्ण जगात अशांतीचे वातावरणनिर्माण झाले आहे.जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की ज्या ठिकाणी अनेक धर्माचे,जातीचे,पंथाचे व अनेक भाषा बोलणारे लोक रहातात. भारताने नेहमीच शांतीचा पुरस्कार केला आहे.परंतु भारताशेजारी गद्दारांची फौज उभी ठाकली आहे. एकीकडे पाकिस्तानचा आतंकवाद, बांग्लादेशचा जातीयवाद, म्यानमारची घुसखोरी, नेपाळमध्ये गृहयुद्ध व चीनची विस्तारवादी नीती यामुळे भारताने सुध्दा जशास तसे उत्तर देण्याचे ठाणले आहे.भारत नेहमी शेजारी राष्ट्रांसोबत शांती प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात असतो.परंतु भारताचा जीवलग मित्र समजल्या जाणाऱ्या नेपाळनेसुध्दा चीनचे पाय चाटण्याचे काम करीत असतो व भारताच्या पाठीत खंजर खुपसण्याचे काम करतो हे आपण मागे पहाले.अशाप्रकारे भारता शेजारचे संपूर्ण राष्ट्रांना चीन आर्थिक मदत करून आपला कब्जा करून सैन्य सामुग्री व एअरबेस तयार करण्याच्या तयारीत आहे.आज विश्र्व शांति टिकवून ठेवण्यासाठी अती लोकसंख्या असलेल्या देशांनी लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.जगाच्या पाठीवर लोकसंख्येच्या बाबतीत चीन नंतर भारताचा नंबर लागतो. परंतु भारताच्या भुभागाचा विचार केला तर जगात लोकसंख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर असल्याचे दिसून येते.त्यामुळे भारताला शांती प्रस्थापित करण्याकरिता एक पाऊल पुढे टाकूनहम दो हमारा एकही मोहीम राबवुन लोकसंख्या नियंत्रणात आणाली पाहिजे. युध्द सामुग्रीच्या चढाओढीमुळे प्रत्येक देश अनेक द्वीधेमध्ये असल्याचे दिसून येते.या द्वीधेपासुन मुक्ती मिळवायची असेल तर प्रत्येक देशांनी अणुचाचण्या, घातक हतीयार, मिसाईल परीक्षण, अणुबॉंब इत्यादींवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.तेव्हाच विश्र्वात शांती प्रस्थापित होवु शकते.आज संपूर्ण जगाला ग्यात आहे की विश्वामध्ये शांति प्रस्थापित करायची असेल तर भारताचा सहयोग अती आवश्यक आहे. आज युक्रेन-रशिया व हमास-इजरायल संघर्ष,इरिण-इझरायल संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी भारत शांतता प्रस्थापित करण्यासाठी अग्रेसर आहे.विश्वशांतीच्या बाबतीत भारत काय आहे हे विश्र्वाला महात्मा गांधींनी दाखवून दिले आणि आज १४० कोटी भारतीयांच्या छत्रछायेच्या माध्यमातून भारत विश्र्व शांतीचा मसिहा बनल्याचे दिसून येते.कारण प्रत्येक देशाला शांतीची गरज आहे.जगाच्या पाठीवर भारताने अनेक उतार-चढाव पाहीले आहेत.यातुनच शांतीचा उगम झाल्याचे दिसून येते. भारताची संस्कृतीच शांतता प्रस्थापित करण्यासाठी झाली आहे.

त्रेतायुग,व्दापरयुग,सत्ययुग आणि कलयुगात सुध्दा भारतीय संस्कृतीने संपूर्ण जगाला शांततेची शिकवण दिली आहे.भारत भुमित महाभारत, रामायण इत्यादी ज्या घटना घडल्या त्या सर्व विश्र्व शांती करीता होत्या ही बाब संपूर्ण जगाने लक्षात ठेवली पाहिजे.भारतातुन जगात जो ही संदेश जातो तो विश्र्व शांती करीता असतो.भारताने पाकिस्तानला शांततेसाठी हजारो वेळा समजविले.परंतु त्यांच्या नसानसात व रक्तात क्रुरता स्पष्ट दीसुन आली. त्यामुळेच पाकिस्तानात आतंवाद उफाळलेला आहे व तो स्वतः रक्ताच्या लाथोळ्यात अडकल्याचे दिसून येते. त्यामुळेच पाकिस्तानपासुन इस्लामीक देशांसह इतर देश अलग-थलग पडल्याचे दिसून येते.विश्व शांती म्हणजे मानसिक सुख नसुन वन्यप्राणी, जीव-जंतु,जंगल संपदा, निसर्गाचे संतुलन, पृथ्वीचे संरक्षण या संपूर्ण बाबींवर योग्य नियंत्रण ठेवुन त्यांची जोपासना केली तर विश्वामध्ये आपोआप शांती नांदायला सुरूवात होईल. विश्र्व हेची माझे घरही भुमिका जगातील प्रत्येक देशांनी व व्यक्तीने जोपासली पाहिजे.आज संपूर्ण जग प्रदुषणामुळे, अनेक आजारामुळे,युध्दजन्य परीस्थितीमुळे जगातील प्रत्येक व्यक्ती त्रस्त आहे.याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे.विश्वामध्ये शांती प्रस्थापित करण्यामागे भारताचा सर्वधर्मसमभाव हा मुलमंत्र सार्थक ठरत आहे.कारण भारतात हिंदू, मुस्लिम, शिख,ईसाई, बौद्ध, फारसी,ख्रिश्चन इत्यादी अनेक धर्माचा व देवी-देवतांचा वास नेहमी नांदत असतो. त्यामुळे विश्र्व शांतीच्या गंगेचा उगम भारतातुन झाल्याचे दिसून येते.या लेखाच्या माध्यमातून मी हेच सांगु इच्छितो की २१ सप्टेंबरला जगातील प्रत्येक व्यक्तीने शांतता प्रस्थापिकरण्यासाठी संकल्प करावा.जगातील देशांना मी आग्रह करेल की विस्तारवादीनीतीचा खात्मा करून जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे.कारण विस्तारवादी नीती संपूर्ण जगाला घातक आहे.जगात भारताला विश्वशांतीचे उगमस्थान, दुत, आधारस्तंभ अशा अनेक उपमा दिल्या आहेत.याची जानीव चीनने सुध्दा ठेवली पाहिजे.

करोना काळापासून संपूर्ण जग नमस्कार करायला लागले आहे हे सुद्धा भारतीय संस्कृतीचे शांतीचे प्रतीक आहे.सध्याच्या परिस्थितीत गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेले युक्रेन-रशिया युद्ध,हमास-इजरायल युद्ध आणि चीन-तैवानचा वाढता संघर्ष टोकाला पोहोचले आहे याला शांत करण्यासाठी भारत अग्रेसर आहे हे भारताने जगाला दाखवून दिले आहे. जगाला यशाकडे वाटचाल करायची असेल तर शांतीचा मार्गअवलंबावाच लागेल मग तो कोणताही देश असो.२१ सप्टेंबर विश्र्व शांतीदिवस लक्षात घेता जगातील प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी वृक्षारोपण करून शांतीचा संदेश संपूर्ण जगाला दिला पाहिजे.जय हिंद!

**-लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार ) नागपूर.**

# देशाच्या विकासातील खरा केंद्र बिंदू विद्यार्थी हाच....

देशाच्या विकासातील खरा केंद्र बिंदू हा विद्यार्थी असतो. तेव्हा चांगले विद्यार्थी घडविले पाहिजे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुजाण नागरिक आहेत. तेव्हा देशाच्या सर्वांगीण विकासासाठी सुजाण नागरिकांची गरज असते. ते प्रामाणिकपणे घडविले गेले पाहिजे. हे घडविण्याचे महान कार्य अध्यापक करीत असतात. प्राथमिक शिक्षण असो किंवा उच्च शिक्षण असो अध्यापकांनी अभ्यासक्रम लक्षात घेऊन अध्ययन केले पाहिजे. दुर्दैवाने काही ठिकाणी आज तसे होताना दिसत नाही. प्राथमिक, माध्यमिक विभागातील प्रगती अतिशय उत्तम प्रकारची विद्यार्थ्यांची असून काही उच्च शिक्षणाचा विचार करता विद्यार्थी पास होण्यासाठी अतिशय जीवाची पराकाष्ठा करताना दिसत आहेत. तेव्हा अशी वेळ विद्यार्थ्यांवर का आली याचा सुद्धा विचार होणे गरजेचे आहे. यात अध्यापक कुठे कमी पडतात का किंवा विद्यार्थी मागे का राहतात याचा सुद्धा विचार होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याला काहीच येत नाही असे सांगून मूळ विषयाला बगल दिली जाते. असे किती दिवस चालणार? यात शालेय किंवा महाविद्यालयीन व्यवस्थापन समितीची अतिशय महत्त्वाची जबाबदारी असते. ती जबाबदारी त्यांनी योग्य प्रकारे पार पाडली पाहिजे. बऱ्याच ठिकाणी समिती नावालाच असल्याची वर्तमानपत्रामध्ये वाचायला मिळते. जर समितीने आपले काम पारदर्शक केल्यास असा विषय लिहिण्याची वेळ येणार नाही. अध्यापन पदाची पात्रता असून आज कायमस्वरूपी अध्यापक लाखाच्या घरात पगार घेतात, तर कंत्राटी अध्यापकांना तुटपुंज्या पगारावर समाधान मानावे लागते. ही अध्यापकांची आर्थिक विषमता दूर होणे गरजेचे आहे. प्रत्येक अध्यापक पदवीधरांना पूर्ण वेतनी पगार मिळालाच पाहिजे. त्याच बरोबर अध्यापकांना शाळाबाह्य कामांपासून दूर ठेवावे.

महत्त्वाची बाब म्हणजे, जी मुले शिष्यवृत्ती परीक्षा पास होऊन शिष्यवृत्ती मिळवतात तीच मुले उच्च शिक्षण घेताना पास होण्यासाठी धडपडताना दिसतात. तेव्हा विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा चिकित्सकपणे अभ्यास होणे गरजेचे आहे. मात्र फार कमी प्रमाणात आपल्या देशात प्रगती होताना दिसून येते. त्यामुळे अनेक पालक आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवीत आहेत. सन २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षेत १४ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळाले. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ पुणे यांच्या मार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल मे महिन्यामध्ये लागला. यात बारावीच्या एकाही विद्यार्थ्याला १०० टक्के गुण संपादन करता आले नाही मात्र दहावीच्या २११ विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण संपादन केले आहेत. असे असताना उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची अभ्यासातील प्रगती काही खालावल्यासारखी वाटते. उलट माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षण देणाऱ्या अध्यापकांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केला तर काही परिस्थिती गृहीत धरून याला जबाबदार कोण? याचे उत्तर आपणा सर्वांना शोधावे लागेल. कारण शेवटी विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे.

वर्षभर अभ्यास करून विद्यार्थी उत्तीर्ण होत नसतील तर दोष कोणाला द्यायचा हा खरा प्रश्न आहे. त्याचप्रमाणे पालकांनी एकत्र येऊन आपली मुले कुठे कमी पडतात? मुले अभ्यास करीत नाहीत का? किंवा कशाप्रकारे अध्यापक अध्ययन करतात याचा बारकाईने अभ्यास होणे आवश्यक आहे. आजची मुले ही उद्याची सुजाण नागरिक आहेत. हे विसरता कामा नये. असेच जर चालले तर अध्यापकांची सुद्धा परीक्षा होणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांच्या विषयाचे ज्ञान लक्षात येईल. म्हणजे यातूनच चांगले विद्यार्थी घडू शकतात. यासाठी अध्यापकांची मानसिक तयारी झाली पाहिजे.

अध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यांकन करावे. त्यानंतर मूल्यांकनाचे निरीक्षण करून विद्यार्थ्यांना योग्य त्या सूचना द्याव्यात. यात अध्यापक तसेच विद्यार्थ्यांचा चांगला फायदा होतो. त्यासाठी अध्यापनामध्ये मूल्यांकनाला महत्त्व आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या दृष्टीने नियमित मूल्यांकन होणे गरजेचे आहे.

अध्यापकांनी सुद्धा आपल्या शैक्षणिक धोरणांचे मूल्यांकन करणे अतिशय महत्त्वाचे आहे. यामुळे विद्यार्थी सुद्धा जबाबदारीने शिक्षण घेऊन स्वत:ची प्रगती करू शकतात. त्यांना मूल्यांकनामुळे त्यांच्या हक्कांची जाणीव निर्माण होते. काही अध्यापक जाणूनबुजून विद्यार्थ्यांना त्रास देतात. याचा परिणाम विद्यार्थी टेन्शनमध्ये येतात. अशा अध्यापकांना सुद्धा धडा शिकविणे आवश्यक आहे. मात्र आपल्या मुलांना पुढे



त्रास अध्यापक देतील म्हणून पालकवर्ग तक्रार करायला पुढे येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा शैक्षणिक संस्थेतील शिक्षण समितीने सतर्क राहणे गरजेचे आहे. तेव्हा अध्यापकांनी आपल्या विषयाच्या अभ्यासक्रमाची चांगली तयारी करावी. नि:पक्षपातीपणे अध्ययन करावे. तरच चांगले विद्यार्थी घडून देशाची प्रगती होण्याला मदत होईल. मात्र आजची परिस्थिती काहीशी वेगळी दिसते. त्यात बदल होणे गरजेचे आहे. अन्यथा विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येऊ शकते.

# अग्रसेन विद्या मंदिर शाळेत भूमिपूजन सोहळा - नव्या पर्वाची सुरुवात

**आत्ताच एक्सप्रेस**

**इटखेडा / प्रतिनिधी /** अग्रसेन विद्या मंदिर शाळेमध्ये शनिवारी २० सप्टेंबर २०२५भव्य भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विद्यालयाच्या विकास प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला. कार्यक्रमाची सुरुवात राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊजी बागडे यांच्या आगमनाने झाली. प्रथम अग्रसेन महाराजांची पूजा व पुष्पहार अर्पणानंतर पारंपरिक भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांचा परिचय व सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. आपल्या प्रेरणादायी भाषणात हरीभाऊजी बागडे यांनी राष्ट्रनिर्मितीत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले तसेच आधुनिक शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक वारसा जपण्याची गरज मांडली.

प्रसंगी व्यासपीठावर शाळा समितीचे विद्यमान अध्यक्ष सच्चानंदजी अग्रवाल, अग्रवाल सभा अध्यक्ष माननीय कुंजबिहारीजी अग्रवाल, उपाध्यक्ष गोकुळजी अग्रवाल, सचिव निधिजी अग्रवाल, कोषाध्यक्ष पंकजजी अग्रवाल, शाळेचे पूर्व अध्यक्ष राजकुमारजी टिबडेवाला व शाळा समितीचे सदस्य यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या शिस्तबद्ध आयोजनासाठी शाळेचे प्राचार्य संतोष कुमार करवा व उपप्राचार्या मयुरी लोगलवार, अधीक्षक अजय सोनुने यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या संपन्नतेसाठी सर्व विभागांचे विभाग प्रमुख विक्रम शर्मा, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अविरत परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली खरात यांनी तर आभार प्रदर्शन दीपाली मोर यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली व परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला.




# सकल सुतार समाजातर्फे विश्वकर्मा प्रगट दिन मोठे उत्सवात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम/** कन्नड तालुक्यातील पिशोर येथील सुतार समाज संघणेतर्फे भगवान विश्वकर्मा प्रगट दिन मोठया उस्वात साजरा करण्यात आला याप्रसंगी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी सिल्लोड नाका, बसस्थानक, संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर, बाजारपेठ, दत्त मंदिर, बालाजी मंदिर, मोठा गणपती मंदिर, सिध्देश्वर महादेव मंदिर या मार्गाने भगवान विश्वकर्मा यांच्या प्रतिमेची टाळ मृदंगाच्या गजरात रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. भगवान विश्वकर्मा मंदिरात या मिरवणुकीची सांगता झाली. यावेळी विश्वकर्मा जयंती उत्सव समिती सदस्य, सुतार समाजातील सर्व महिला, पुरुष व आबाल वृध्द यांची उपस्थिती होती.

गावातून कलश यात्रा काढण्यात आली, त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांना फराळ



देण्यात आले. उत्सव समितीच्या वतीने मिरवणुकीला उपस्थिती दर्शविणाऱ्या मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

या सर्व कार्यक्रमांचे नियोजन सकल सुतार समाज व श्री विश्वकर्मा जयंती महोत्सव समिती यांच्याकडून करण्यात आले.

# नादरपुर येथे नारी सशक्त मोहीम राबविण्यात आली

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम/** कन्नड तालुक्यातील नादरपूर येथे आरोग्य उपकेंद्र स्वस्थ नारी सशक्त परिवार या मोहिमे आरोग्य सेविका सविता सुडके आरोग्य सहाय्यक सोनवणे साहेब आरोग्य सेवक मगारे साहेब घुले साहेब आशाताई संगीता पंडित व मीनाताई जंगले ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सर्व सदस्य



दरम्यान सर्व वयोगटातील महिलांचे आरोग्य तपासणी करण्यात आली या वेळी आर- तंटामुक्त अध्यक्ष पोलीस पाटील गावातील नागरिक महिलां उपस्थित होते.

# अधिकृत वीजजोडणी घेऊनच साजरा करा नवरात्रोत्सव महावितरणचे मंडळांना आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/**सोमवारपासून घटस्थापनेने नवरात्रोत्सवाला सुरुवात होत आहे. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी नवरात्रोत्सव मंडळांनी अधिकृत वीजजोडणी घेऊनच उत्सव साजरा करावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

महावितरणने सार्वजनिक उत्सव मंडळांसाठी तात्पुरती वीजजोडणी देण्याची व्यवस्था केली असून केवळ घरगुती दरात वीज जोडणी देण्यात येते. उत्सवातील रोषणाई, आकर्षक देखावे, मंडप, महाप्रसाद आणि इतर कार्यक्रमांसाठी लागणारी वीज व्यवस्था फक्त अधिकृत वीज कंत्राटदारांकडूनच करून घ्यावी.

बेकायदेशीर आणि अनधिकृत वीजजोडण्यांमुळे शॉर्ट सर्किट किंवा इतर गंभीर अपघात होण्याचा धोका असतो. त्यामुळे सुरक्षेशी कोणतीही तडजोड न करता अर्ज करताच मंडळांना तात्पुरती वीज जोडणी दिली जाईल, असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

मंडपातील विजेचे वायरिंग सुव्यवस्थित आणि प्रमाणित असावे. मीटर केबिनमध्ये जाण्याची परवानगी केवळ अधिकृत आणि प्रशिक्षित व्यक्तीलाच द्या. वीज जोडण्यांसाठी नेहमी दर्जेदार वायर आणि स्विच वापरा. आपत्कालीन परिस्थितीत संपूर्ण मंडपाचा वीजपुरवठा एकाच स्विचने खंडित करण्याची सोय असावी. तुटलेल्या वायर जोडण्यासाठी केवळ दर्जेदार इन्सुलेशन टेपचाच वापर करा. मीटर आणि स्विच जवळचा रस्ता नेहमी मोकळा ठेवावा, जेणेकरून गरज पडल्यास त्वरित पोहोचता येईल. मंजूर झालेल्या भारापेक्षा मंडपातील विजेचा वापर जास्त होणार नाही याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

आणीबाणीच्या परिस्थितीत त्वरित मदतीसाठी महावितरणने २४ तास उपलब्ध असलेले टोल-फ्री क्रमांक दिले आहेत. १९१२, १८००-२३३-३४३५. १८००-२१२-३४३५ या क्रमांकावर संपर्क साधता येईल. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरण स्थानिक अभियंता आणि तंत्रज्ञांचे मोबाईल क्रमांक जवळ ठेवावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

तात्पुरत्या वीजजोडणीसाठी मंडळांना त्यांच्या मंजूर वीजभाराप्रमाणे अनामत रक्कम भरावी लागेल. ही रक्कम ऑनलाईन भरल्यास, उत्सव संपल्यानंतर वीजबिलाची रक्कम वजा करून उरलेली रक्कम विनाविलंब परत केली जाईल. यामुळे रक्कम परत मिळवण्यासाठी वाट पाहावी लागणार नाही आणि मंडळाची प्रक्रिया अधिक सुलभ होईल.

# शासनाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहचवा- आ.सतीश चव्हाण

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** केंद्र सरकार तसेच राज्य सरकारच्या विविध योजना आहेत. या योजनेचा लाभ समाजातील सर्व सामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आ.सतीश चव्हाण यांनी केले.




राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने राष्ट्रवादी भवन येथे पक्षातील विविध सेलची जिल्हा आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पक्षाची नवीन जिल्हा कार्यकारिणी देखील जाहीर करण्यात आली. याप्रसंगी बोलताना आ.सतीश चव्हाण म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हा पुरोगामी विचारांचा पक्ष म्हणून ओळखला जातो. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याने नेहमीच राष्ट्रवादी काँग्रेसला साथ दिली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत युवक, महिलांना संधी दिली जाणार असून जो निवडून येणारा आहे त्याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. आपला पक्ष जिल्ह्यात एक नंबरचा पक्ष ठरला पाहिजे यासाठी सर्वांनी मतभेद विसरून एकदिलाने काम करावे असे आवाहन यावेळी आ.सतीश चव्हाण यांनी केले. नव्याने जाहीर करण्यात आलेल्या जिल्हा कार्यकारिणीमध्ये संतोष कोल्हे, ज्ञानेश्वर सिदलंबे, नासेर पटेल, ज्ञानेश्वर दुधारे, अनिल चव्हाण, हाजी अकिल शेख, नितीन देशमुख यांच्यासह २६ जिल्हा उपाध्यक्ष, महेश उबाळे, सुधीर माने, अशोक गायकवाड, दत्ता पाटील, बाळासाहेब भोसले, आप्पासाहेब निर्मळ, नितीन धुमाळ यांच्यासह १९ जिल्हा सरचिटणीस, मुश्ताक पटेल, नईम पटेल, भगवान कामठे, नंदु सोनवणे, महेश खेडकर, कारभारी गायके, बाळासाहेब शेळके, प्रताप निंबाळकर, रणजित देशमुख, राहुल डकले, समीर पटेल आदींसह ३७ जिल्हा सचिव अशी जंबो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.

याप्रसंगी मा.आ.नितीन पाटील, दिलीप बनकर, अभिजीत देशमुख, संजय जाधव, हाजी अकील शेख, संतोष कोल्हे, मनोज घोडके, ठगण भागवत, दत्ता भांगे, अनुराग शिंदे यांच्यासह विविध तालुक्याचे तालुकाध्यक्ष, विविध सेलचे जिल्हाध्यक्ष, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गंगापूर आठवडी बाजारात सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था नसल्याने भाजीपाला विक्रेत्यांची उडाली धांदळ

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी /सुभान शहा /** गंगापूर शहरात शनिवारी आठवडी बाजार भरत असतो मात्र या ठिकाणी अनेक गावावरून मोठ्या प्रमाणात भाजीपाला विक्रेत्या व तसेच किराणा व विविध प्रकारचे घरगुती साहित्याचे दुकाना मोठ्या प्रमाणात बाजारात थाटले जातात तसेच त्यांच्याकडून जागे भाडे वसुली केली जाते. एका कंट्रकदाराच्या माध्यमातून भाजीपाला विक्रेत्याकडून व बाजारात दुकानदाराकडून मोठ्या प्रमाणात वसुली केली जाते. परंतु त्यांना नगर परिषदे कडून मिळणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे व्यापाऱ्यांनी या ठिकाणी नाराजी व्यक्त केली आहे. गंगापूर नगरपालिकेचा कारभार रामभरोसे चालत असल्याची चर्चा आहे. महिलांना व पुरुषांना उघड्यावर लघु शंका करावी लागत आहे शौचालयाची व्यवस्था नाही या ठिकाणी भाजी विक्रेत्यांना देखील पिण्याच्या पाण्याची सुद्धा व्यवस्था नाही. या सगळ्या जबाबदाऱ्या प्रशासनाकडून व कन्ट्रकदाराकडून केल्या जाते परंतु भाजी विक्रेत्यांना व बाजारात येणाऱ्या कोणत्याही नागरिकांना लघु शंका करण्यासाठी मुताऱ्या व शौचालय उपलब्ध नसल्याने त्यांची मोठी धांदल उडत असतें व्यवसायिकांच्या समस्या सुटता सुटेना अशी परिस्थिती आठवडी बाजारात पाहायला मिळत आहे . व्यापाऱ्यांना व भाजीपाल्याचा बाजार करायला आलेल्या नागरिकांना उघड्यावर लघवी करावी लागते व लघू शंका करण्यासाठी व्यवस्था नसल्याने त्यांचे आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. भाजीपाला विक्रेत्यासह अनेक व्यापाऱ्यांना या ठिकाणी मुताऱ्याची व्यवस्था नसल्यामुळे खरी ओळख या बाजाराची बनली आहे. प्रशासन मात्र प्रस्तावाच्या मंजुरीवर लक्ष केंद्रीत करून आहे का? नागरिकांसाठी मुताऱ्याची व्यवस्था होणार का? प्रशासन काय भूमिका घेणार याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

# आशा जीव्हाळा व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची आज महाराष्ट्राला सद्या गरज .... जागेवरच दिली शहीद जवानाच्या वृद्ध माता पित्यास शिधापत्रिका

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड उदय कुलकर्णी /** कन्नडचे तहसीलदार विद्याचरण कडवकर नुसते पदावरच नही तर त्यांच्या कार्यालयात प्रत्येक दिवशी कामानिमित्य आलेलेल्या तालुक्यातील प्रत्येकाचे काम ते क्षणाचाही विलंब न लावता हातावेगळे करतांना दिसून येत आहे. असाच काहीसा प्रसंग नुकताच घडला असुन मौजे औराळा गावातील शहीद जवान सुनील उत्तमराव जाधव ( कारगिल युद्धात) देश सेवा करतांना दोन वर्षांपूर्वी शहीद झाला होता. काही दिवसापूर्वी त्याची पत्नीही स्वर्गवासी झाली होती.त्यातच घरची परिस्थिती अत्यंत हलखीची व बेताची असल्याने व घरात वृद्ध आई वडील नव्वदीचे आसपास असल्याने त्यांचेकडून कुठलेही काम होत नव्हते.त्यात त्यांना शिधा पत्रिका नसलेमुळे रेशनही मिळत नव्हते म्हणून गेल्या अनेक दिवसापासून ते दोघे तहसील कार्यालयात शिधापत्रिका मिळावी म्हणून ये जा करीत होते.सदर माता पित्याकडे तहसीलदार विद्याचरण कडवकर यांची नजर जाताच त्यांनी त्यांचेकडे अस्ताविकपणे विचारणा केलीअसता, सदर वृद्ध माता पित्यांनी त्यांच्या अडचणी बाबद त्यांना सांगितले असता तहसीलदार कडवकरांनी त्यांना आपल्या केबिनमध्ये नेऊन शांत केले.व क्षणाचाही विलंब न लावता सर्व चक्रे फिरवून जागेवरच त्यांना प्राधान्य कुटुंब म्हणून शिधापत्रिका देऊन शासनाच्या अन्नधान्य वितरणाचा लाभ तसेच संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत वृद्ध पेन्शन योजना या दोनही शासन योजनेचा लाभ मिळवून दिला.या प्रसंगी शहीद जवानांच्या माता पित्याच्या डोळ्यात आनंदाश्रू मावेनासे झाले होते.इतकेच काय सदर ठिकाणी उपस्थित नागरीकांच्याही भुवया पाणवल्याच्या दिसून आल्या.यावेळी तहसीलदार कडवकर, पुरवठा विभागाचे निरीक्षक अधिकारी निलेश राठोड,नायब तहसीलदार विजयकुमार सोनावणे,तलाठी दिपक एरंडे हे उपस्थित होते. त्यामुळेच गोरगरिबांच्या व्यथा जाणून त्या चुटकी सरशी सोडविणाऱ्या व त्यांच्या जीवनात चैतन्य निर्माण करणाऱ्याआपल्या सारख्या अनेक अधिकाऱ्यांची या महाराष्ट्राला आज नितांत गरज आहे.



# वैजापुरातील प्रभाग क्रमांक चार मधील समस्यांवर तातडीने कार्यवाही करा - साबेर पठाण

**वैजापूर प्रतिनिधी /** वैजापूर शहरातील विविध भागांमध्ये तसेच विशेषता प्रभाग क्रमांक चार मधील नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत असून नागरिकांच्या समस्यांवर तोडगा काढून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. या मागणीसाठी भाजपा अल्पसंख्यांक शहराध्यक्ष साबेर पठाण यांच्या नेतृत्वात भाजप पदाधिकाऱ्यांनी व अल्पसंख्यांक समाज बांधवांनी वैजापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी बी.यू.बिघोत यांना गुरुवारी निवेदन दिले.




भाजपकडून देण्यात आलेल्या निवेदनात साफसफाई, रस्ते , नाल्या, लाईट संदर्भातील मूलभूत समस्यांची सोडवणूक करावी अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर साबेर पठाण,आसिफ शेख,फारुक शेख, राजेक शेख, शोएब शाह,जाहिद शेख, फिरोज शेख, इब्राहिम शेख, रिजवान खान,इम्तियाज शेख, नदीम सय्यद, फैजान शहा, जुनेद खान यांच्या सह परिसरातील शेकडो नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**नागरिकांनी निवेदनातून मांडलेल्या समस्या....**

* वैजापूर शहरात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून यामुळे शहरातील नागरिकांना ,लहान मुलांना, वृद्धांना धोका संभवतोय त्यामुळे मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा.

*वैजापूर पोलीस स्टेशनच्या मागील गल्लीमध्ये ड्रेनेज लाईनचे काम अपूर्ण असल्याने पावसाचे पाणी नागरिकांच्या घरात शिरत आहे यासाठी उपाययोजना करावी.

* जुनी मढी, राजपूत गल्ली, काटे मारुती मंदिर परिसरात नवीन तयार झालेल्या रस्त्यावर ब्रेकर टाकण्यात यावे.

*दर्गा दरवाजा मज्जित परिसर व त्या समोरील पटांगण भागात मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य पसरले असल्याने साफसफाई करावी.

* आठवड्यातील चार ते पाच दिवस कचरा साफसफाई ची गाडी येतच नाही.

अशा समस्या या निवेदनातून नागरिकांनी मांडल्या आहेत.

## संक्षिप्त

## जांभाळा येथील नारायण ढगे यांची भाजपच्या गंगापूर तालुका. उपाध्यक्षपदी निवड...



**आत्ताच एक्सप्रेस गंगापूर प्रतिनिधी/ फिरोज मन्सुरी** /गंगापूर तालुक्यातील जांभाळा येथील नारायण जनार्दन ढगे यांची गंगापूर तालुक्याच्या भाजपाच्या तालुका उपाध्यक्षपदी आ, बंब यांच्या आदेशाने निवड करण्यात आली आहे. दरम्यान नारायण ढगे यांची भारतीय जनता पार्टी गंगापूर तालुका उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल गावकरी व परिसरातील नागरिकातर्फे त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला यावेळी शिवनाथ मालकर,के .डी रावते, रवी चव्हाण,दीपक पाटील,संतोष बारगळ,हबीबभाई शेख, गफूर पठाण,सुदाम भास्कर श्रीरामधन भाऊ,मिथुन गेहलोत नागेश पवार नंदु जाधव नईम शेख किरण दाणे बाळू बनकर गणेश दाणे आदींनी ढगे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.दरम्यान जिल्हाध्यक्ष संजय धनायत यांच्या आदेशाने तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी ढगे यांची नियुक्ती केली आहे..

# धनगर समाजाचा अनुसूचित जमात (ST) प्रवर्गात समावेश करण्यास पाठींबा





**आत्ताच एक्सप्रेस जालना प्रतिनिधी**/ धनगर समाज हा महाराष्ट्रातील ऐतिहासिक व पारंपरिक समाज असून शतकानुशतके पशुपालन, शेती व जनजीवनाशी जोडलेला आहे.

समाजाच्या मागणीनुसार त्यांचा अनुसूचित जमात प्रवर्गात (ST) समावेश व्हावा, अशी मागणी दीर्घकाळापासून होत आहे.जालना येथे या मागणीसाठी श्री दिपक बो-हाडे यांनी दि. १७/०९/२०२५ पासुन आमरण उपोषण सुरू केलेले आहे,

त्यांच्या या उपोषणाला जालना जिल्ह्याचे खासदार डॉ. कल्याण काळे व काँग्रेस पक्षाच्या वतीने पाठींबा देण्यात आला डॉ.कल्याण काळे हे अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतक-यांचे नुकसान पाहणीसाठी सिल्लोड व सोयगाव तालुक्यात असल्यामुळे त्यांच्या वतीने श्री भाऊसाहेब बापू काळे,

श्री राजेंद्र राख उपाध्यक्ष प्रदेश काँग्रेस कमिटी महाराष्ट्र,श्री अतिक भाई खान काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष जालना, श्री कृष्णा पा. पडुळ काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष जालना, श्री लक्ष्मण मसलेकर काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष बदनापूर, श्री निळकंठ वायाळ काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष मंठा, श्री बाबासाहेब आकात काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष परतुर, श्री गणेश कुलकर्णी काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष परतुर, श्री कल्याण तारडे काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष अंबड, जालना पं. स. चे मा. उपसभापती श्री सोपान तिरुखे, श्री ज्ञानदेव इंगोले, श्री राम सिरसाठ यांनी पाठींब्याचे पत्र दिले यावेळी बोलताना श्री भाऊसाहेब काळे म्हणाले की, शासनाने पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेऊन धनगर समाजाला ड्ढ प्रवर्गात आरक्षण देवु असे आश्वासन दिले होते त्याबाबत काय झाले? आजच्या काळात धनगर समाजाला शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी योग्य न्याय देणे ही काळाची गरज आहे.

शासनाने ही मागणी मान्य करून लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी सर्वपक्षीय, सामाजिक संस्थांकडून एकमुखी मागणी होत आहे.

आम्ही धनगर समाजाच्या या न्याय्य मागणीस पूर्ण पाठींबा देत आहोत. शासनाने सकारात्मक पावले उचलून समाजाच्या भावनांचा आदर करावा असे आवाहन त्यांनी केले तसेच खासदार डॉ कल्याण काळे साहेब हे सदरील आंदोलनस्थळी भेटीसाठी सोमवारी येणार असल्याचे कळवले.

## शोभाबाई रत्नराव कसबे यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस जालना प्रतिनिधी**/ जालना तालुक्यातील बदापूर येथील शोभाबाई रत्नराव कसबे वय (७०) यांचे आज पहाटे दु:खद निधन झाले.त्यांच्यावर बदापूर येथील स्मशानभुमीत अंत्यसंस्कार



करण्यात आले. त्यांचा स्वभाव अत्यंत मनमिळावू होता. त्यांच्या पश्चात पती,एक मुलगा, चार मुली, जावई, सुन, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अचानक जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# जगाला शांततेची तीव्र गरज - उमेश बजाज

## रोटरी क्लब इलाईटने रॅलीतून दिला जागतिक शांततेचा संदेश




**आत्ताच एक्सप्रेस जालना प्रतिनिधी**/ रोटरीच्यावतीने २१ सप्टेंबर या जागतिक शांतता दिनानिमित्त शांती सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटतर्फे शनिवार, दि. २० सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांची भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीतून जागतिक शांततेचा प्रभावी संदेश देण्यात आला.

या रॅलीत जैन प्राथमिक विद्यालयाचे तब्बल ६०० विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते. जैन प्राथमिक विद्यालयापासून रॅलीची सुरुवात झाली. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. गीता पोरवाल यांच्या हस्ते रॅलीचे उद्घाटन करण्यात आले. शिवाजी पुतळा परिसरातून रॅली मार्गक्रमण करताना विद्यार्थ्यांनी शांततेबाबत घोषणाबाजी करून जनतेचे लक्ष वेधून घेतले. रॅलीचा समारोप विद्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहात झाला. यावेळी बोलताना रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटचे अध्यक्ष उमेश बजाज म्हणाले की, आज जगभरात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा वेळी जागतिक शांततेचा संदेश प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचणे ही काळाची गरज आहे. शांतीमुळेच समाजाचा विकास होतो. हिंसाचार, द्वेष आणि असहिष्णुता यामुळे मानवतेला मोठा धोका निर्माण होतो. विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमातून मिळालेला शांतीचा संदेश आयुष्यभर लक्षात ठेवून पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवावा.

शांततेतूनच प्रगती आणि ऐक्य साध्य होते. रोटरी ही संस्था याच भावनेने समाजात कार्यरत आहे. क्लबच्यावतीने शांतता या विषयावर शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली असून, त्यात सुमारे १०० शाळा सहभागी होत आहेत.

यासाठी प्रथम बक्षीस २१००, द्वितीय बक्षिस ११०० व तृतीय बक्षीस सातशे रुपयांचे देण्यात येऊन सर्व विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र प्रदान केले जाणार असल्याचे उमेश बजाज यांनी सांगितले.

कार्यक्रमाला रोटरी क्लबचे सचिव शरद गादिया, स्मिता चेचानी, राजेंद्र अग्रवाल, विजयालक्ष्मी बाले, अनया अग्रवाल, रवींद्र हुसे, विनोद देशमुख, संगीता गादिया यांच्यासह क्लबचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहरातील प्रसिद्ध समाज सेवक तथा श्री.शिवाजी हायस्कूल चे निवृत्त मुख्याध्यापक प्र.ज. निकम गुरुजी यांचे निधन



**आत्ताच एक्सप्रेस छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ शहरातील प्रसिद्ध समाज सेवक तथा श्री.शिवाजी हायस्कूल चे निवृत्त मुख्याध्यापक प्र. ज.निकम गुरुजी यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी आज सकाळी ७, वाजता अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्याची अंत्ययात्रा साईनगर, प्लॉट .१०६७, सिडको एन ६ येथून दुपारी ४,०० वाजता येथून निघून एन ६, सेंट्रल १ नाका स्मशान भूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांच्या अंत्ययात्रेत माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजीमंत्री राजेंद्रजी दर्डा,माजी नगरसेवक राधाकृष्ण गायकवाड,द्वारकादास पाथ्रीकर तसेच शहरातील नामवंत व्यक्ती,शिक्षणक्षेत्रातील नामवंत व्यक्ती तसेच शिक्षक, कलाकार तसेच नागरीकांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती.माजी मंत्री राजेंद्र दर्डा, तसेच माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी निकम गुरुजीच्या आठवणींना याप्रसंगी उजाळा दिला.त्यांच्या पश्चात दैनिक स्वरगंगाचे संपादक मंगेश निकम, महापालिकेचे माजी उपायुक्त रवींद्र निकम आणि मुलगी संध्याताई चव्हाण,तसेच नातू असा मोठा परिवार आहे. निकम गुरुजी यांचा विद्यापीठ नामांतर आंदोलन , मराठवाडा विकास आंदोलनात सक्रीय सहभाग होता. यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने ते दरवर्षी लोककला महोत्सवाचे आयोजन करीत असत. विविध सामाजिक उपक्रमात सहभागी होणारे निकम गुरुजी यांची सर्वत्र ओळख होती.

## १२ प्राचीन देवी मंदिरे असलेलं मराठवाड्यातील पैठण हे एकमेव तीर्थक्षेत्र

**पैठण प्रतिनिधी/बबन उदावंत/** दक्षिण काशीतील पैठण क्षेत्री अतिशय प्राचीन तथा ऐतिहासिक १२ देवींची मंदिरे असुन येत्या दि.२२,सोमवार पासून घटस्थापना नवरात्र उत्सव सोहळा या मंदिरांमधुन परंपरेनुसार साजरा केला जाणार आहे. त्याची तयारी मंदिर व्यवस्थापनाकडुन केली जात आहे.नवरात्र उत्सवात पैठण येथील या बारा देवींचे दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्रातुन देवी भक्त येतात.या सोहळ्याची सांगता दि.२ ऑक्टोबर गुरूवार दसऱ्याच्या तथा विजयादशमी शुभ पर्वावर होणार आहे.

पैठण शहरात विविध वार्डात विखुरल्या गेलेल्या १२ देवींची मंदिरे खालील प्रमाणे आहेत.

१) संतोषी माता मंदिर( जुने नवनाथ मंदिर तथा बौद्धवाडा परिसर

२) कालिका माता मंदिर जुनी रंगारहट्टी गल्ली

३) भद्रकाली देवी मंदिर जुनी जर गल्ली

४) रेणुका देवी मंदिर (हताई गल्ली तथा रेणुका देवी जुनी गल्ली)

५) दुर्गा देवी मंदिर जुनी दुर्गावाडी

६) रेणुकामाता खांबात विराजमान मुर्ती मंदिर (लोळगे निवास जुनी सुतारपार गल्ली)

७) तुळजा माता मंदिर(श्रीबार निवास जुनी पिठुंबरा गल्ली)

८) मंडई देवी कापड मंडई

९) मुंम्बादेवी भोईवाडा

१०) गिरजा देवी मंदिर जैनपुरा गल्ली




११) कालिका माता कहारवाडा गल्ली

१२) तुळजा माता मंदिर त्रिंबकदास नगर अदि देवीचे मंदिरे आहेत.१२ प्राचीन महादेव मंदिर,१२ प्राचीन गणपती मंदिरे,१२ प्राचीन देवी मंदिरे असलेलं मराठवाड्यातील पैठण हे एकमेव तीर्थक्षेत्र आहे.

# जय माँ नवरात्र महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी विनोद बलीराम यादव यांची बिनविरोध निवड



**आत्ताच एक्सप्रे जालना प्रतिनिधी** / जालना शहरातील कन्हैयानगर परिसरात मागील सतरावर्षांपासून अखंडितपणे आयोजित करण्यात येत असलेल्या जय माँ नवरात्र महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी विनोद बलीराम यादव यांची सन २०२५ साठी बिनविरोध निवड झाली आहे. नुकत्याच झालेल्या बैठकीत ही निवड जाहीर झाली असून मावळते अध्यक्ष प्रकाश राऊत यांनी अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली.

कन्हैयानगरमधील सामाजिक जाणीवेतून जय माँ सामाजिक संस्था सन २००९ मध्ये स्थापन झाली. या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमेश भगत तर संस्थापक सचिव मनोज काबलिये आहेत. संस्थेच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात आणि त्याच अंतर्गत जय माँ नवरात्र महोत्सव समितीची स्थापना करण्यात आली. समिती स्थापनेच्या पहिल्या वर्षी तत्कालीन अध्यक्ष मनोज काबलिये यांनी सायकलवरून वैष्णवदेवी यात्रेला प्रस्थान करून भक्ती, श्रद्धा आणि हिंदू एकात्मतेचा संदेश दिला होता. त्याच काळात कन्हैयानगरातील लोकनेता बलीराम यादव चौकात भाविकांना दर्शन घेण्यासाठी विशेष सोय उपलब्ध करून देण्यात आली आणि त्यानंतर प्रत्येक वर्षी नवरात्र महोत्सव मोठ्या उत्साहात व सातत्याने साजरा होऊ लागला.

गेल्या सतरावर्षांत समितीने अखंडितपणे नवरात्र महोत्सवाचे आयोजन केले असून परिसरातील धार्मिक आणि सामाजिक वातावरणात सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. महोत्सवाच्या माध्यमातून हिंदू जनजागृतीसाठी कीर्तन, भजन, देवीचे जागरण, आरती, पालखी सोहळे अशा अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमांमध्ये भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग लक्षणीय ठरतो.

मावळते अध्यक्ष प्रकाश राऊत यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेत मागील वर्षाचा हिशेब सादर करण्यात आला आणि त्यानंतर नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. या कार्यकारिणीत अध्यक्षपदी विनोद यादव यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव आणि कोषाध्यक्ष अशा विविध पदांवर नवीन जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

समितीच्या कार्यामध्ये योगेश भगत, भगगु भगत, धन्नुलाल भगत, पदमराज भगत, शिवाजी बोंबाळे, विश्वनाथ क्षीरसागर, कचरुलाल भगत, प्रकाश राऊत, मनोज शर्मा आणि तुळशीराम गोरे यांच्यासह असंख्य भाविकांचा सहभाग आहे. या सर्वांच्या सहयोगाने नवरात्र महोत्सव एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी सोहळा ठरला आहे.

नवनियुक्त अध्यक्ष विनोद यादव यांनी भाविकांचे आभार मानले असून समितीने गेल्या सतरावर्षांत ज्या प्रकारे परंपरा जपली आहे, ती यापुढेही कायम ठेवून सामाजिक बांधिलकी आणि धार्मिक उत्साह यांचा संगम साधण्याचा प्रयत्न सुरूच राहील, असा निर्धार व्यक्त केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813